## भुसंपादन निर्देशन दरखास्त क्र. ३९/२०२२ मध्ये निशाणी क्र.१६ कडील अर्जावर आदेश.

१) प्रस्तुतचा अर्ज न्यायनिर्णीत धनकोतर्फे निशाणी क्र. १ कडील दरखास्त पिटीशनमध्ये व दरखास्त पिटीशनसोबत जोडलेल्या हिशोबाच्या स्टेटमेंटमध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२) प्रस्तुत अर्जास न्यायनिर्णीत ऋणको क्र. १ ते ३ यांचे म्हणणे घेण्यात आले आहे. न्यायनिर्णीत ऋणको क्र. १ व २ तर्फे दिलेल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, धनको यांनी दरखास्त पिटीशनमध्ये नुकसान भरपाईच्या रकमेचा योग्यरित्या हिशोब नमूद केला नाही व त्यामुळे या स्थितीला हा अर्ज समर्थनिय नाही व त्यामुळे अर्ज नामंजूर करावा. न्यायनिर्णीत ऋणको क्र. ३ तर्फे या अर्जास दिलेल्या म्हणण्यामध्ये या अर्जास तीव्र आक्षेप असल्याचे कथन केले आहे.

३) प्रस्तुत अर्जाच्या कामी दोन्ही पक्षातील विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. न्यायनिर्णीत धनको यांनी ही दरखास्त एल. ए. सी. क्र. २०२७/२००४ या प्रकरणातील न्यायनिर्णयाप्रमाणेची व प्रथम अपिल क्र. ४२२/२०१९ या प्रकरणातील मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाप्रमाणेची नुकसान भरपाईची रक्कम वसुल करुन मिळण्यासाठी दाखल केली आहे. न्यायनिर्णीत धनको यांनी या अर्जात असे कथन केले आहे की, न्यायनिर्णीत ऋणको यांच्याकडून रुपये ९८,२२,९८८/- इतकी रक्कम वसुल करावयाची आहे. परंतु अनावधानाने व टायपिंगच्या चुकीमुळे दरखास्त पिटीशनमध्ये रकाना क्र. ७ व ९ मध्ये रुपये ९८,२२,९८८/- या ऐवजी वसुल करावयाची रक्कम ही अनुक्रमे रुपये ९८,६७,९१९/- व रुपये ९८,७७,९१९/- अशी नमूद करण्यात आली आहे. तसेच दरखास्त पिटीशनसोबत जोडलेल्या हिशोबाच्या स्टेटमेंटमध्ये रकाना क्र. १३ मध्ये ऋणकोने जमा केलेली रक्कम ही रुपये ५३,१९,५०८/- इतकी नमूद करण्याऐवजी ती रुपये ३७,७६,३०६/- इतकी नमूद केली आहे व तसेच वसुल करावयाची रक्कम ही रुपये ९८,२२,९८८/- ऐवजी

रुपये ९८,७७,९१९/– अशी नमूद करण्यात आली आहे. न्यायनिर्णीत धनको हा दरखास्त पिटीशनमध्ये रकाना क्र. ७ व ९ मध्ये वसुल करावयाची रक्कम ही रुपये ९८,६७,९१९/– ऐवजी रुपये ९८,२२,९८८/– अशी नमूद करुन तशी दुरुस्ती करु इच्छीत आहे व तसेच दरखास्त पिटीशनसोबत जोडलेल्या हिशोबाच्या स्टेटमेंटमध्ये रकाना क्र. १३ मध्ये ऋणकोने जमा केलेली रक्कम ही रुपये ३७,७६,३०६/– ऐवजी रुपये ५३,१९,५०८/– व रकाना क्र. १६ मध्ये वसुल करावयाच्या रकमेमध्ये रुपये ९८,७७,९१९/– ऐवजी रुपये ९८,२२,९८८/– अशी नमूद करुन दुरुस्ती करु इच्छीत आहे. निशाणी क्र. १ कडील दरखास्त पिटीशनचे अवलोकन करता असे दिसून येते की, न्यायनिर्णीत धनको यांनी दरखास्त पिटीशनमध्ये रकाना क्र. ७ व ९ मध्ये वसुल करावयाची रक्कम ही रुपये ९८,६७,९१९/– व रुपये ९८,७७,९१९/– इतकी नमूद केली आहे. तसेच न्यायनिर्णीत धनको यांनी दरखास्त पिटीशनसोबत जोडलेल्या हिशोबाच्या स्टेटमेंटमध्ये रकाना क्र. १६ मध्ये वसुल करावयाची रक्कम ही रुपये ९८,७७,९१९/– इतकी नमूद केली आहे. यावरुन असे दिसून येते की, न्यायनिर्णीत धनको यांनी दरखास्त पिटीशनमध्ये व त्यासोबत जोडलेल्या हिशोबाच्या स्टेटमेंटमध्ये वसुल करावयाची रक्कम ही जास्तीची लिहीली आहे व ऋणको यांनी जमा केलेली रक्कम ही रुपये ५३,१९,५०८/– ऐवजी रुपये ३७,७६,३०६/– इतकी कमी नमूद केली आहे. या अर्जाद्वारे न्यायनिर्णीत धनको हा दरखास्त पिटीशनमध्ये व त्यासोबत जोडलेल्या हिशोबाच्या स्टेटमेंटमध्ये वसुल करावयाची रकमेमध्ये योग्य ती रक्कम नमूद करुन व ऋणको यांनी जमा केलेल्या रकमेच्या ठिकाणी योग्य ती रक्कम नमूद करुन तशी दुरुस्ती करु इच्छीत आहे ही बाब विचारात घेता व वरील नमूद कारणे विचारात घेता माझ्या मते प्रस्तुतचा दुरुस्तीचा अर्ज समर्थनीय आहे व तो मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. न्यायनिर्णीत धनको यांनी प्रस्तुत अर्जामध्ये विनंती केल्याप्रमाणेची योग्य ती दुरुस्ती मुळ दरखास्त पिटीशनमध्ये व सोबत जोडलेल्या हिशोबाच्या स्टेटमेंटमध्ये करावी व त्यानंतर दुरुस्त दरखास्त पिटीशनची व हिशोबाच्या स्टेटमेंटची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३. वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

स्वा/-

दिनांकः- ०४/०३/२०२४ (पां. लिं. घुले)

ठिकाणः- दारव्हा दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,दारव्हा.